**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.**

मा.शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०८

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०३/०३/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माशिक्षण समितीची पाक्षीक सभा **गुरुवार** दिनांक **०३/०३/२०२२** रोजी **दुपारी ३.००** वाजता मा. अवर सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आली होती. मा.सभापती शिक्षण समिती या महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दुस-या मजल्यावरील मा.सभापती शिक्षण समिती यांचे दालनातून सभा संचलित करण्यात आली. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
**२. मा.पवार मनिषा प्रमोद**
**३. मा.सारीका शिवाजी सस्ते**
**४. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे**
**५. मा.खानोलकर प्रज्ञा महेश**
**६. मा.वाघमारे अश्विनी विक्रम**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.संदिप खोत - उप आयुक्त मा.संजय नाईकडे - प्रशासन अधिकारी (१) मा.रोहिणी शिंदे प्रशासन अधिकारी (२) मा.विजय काळे - उपअभियंता (स्थापत्य) अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय :-१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या बालवाडी शाळेतील विद्यार्थांना मे. सहयाद्री इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट,निगडी प्राधिकरण मार्फत सकस पोषण आहार पुरविणेबाबत...**

**मा.शैलेश मोरे , मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.**

**विषय :-२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील इ.६ वी ते इ.७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता "मे.स्पार्कल क्लासेस" यांच्या मार्फत हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविणेबाबत..**
**मा.शैलेश मोरे , मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.**

---------

**दिनांक - १७/०२/२०२२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.०७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

**ठराव क्रमांक - १०** विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०३/०२/२०२२
सुचक :- मा. शैलेश मोरे अनुमोदक : मा. मनिषा पवार
संदर्भ - मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र मोरे व मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत २०७ बालवाडी असून सदर बालवाडी विद्यार्थांकरिता सकस आहार पुरविण्यात येतो. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता बालवाडी विद्यार्थांना सकस आहार पुरविणेबाबत ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंर्तगत येणाऱ्या बालवाडी शाळेतील विद्यार्थांना मे. सहयाद्री इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट,निगडी प्राधिकरण मार्फत सकस पोषण आहार पुरविणेबाबत प्रस्ताव आलेला असून त्यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.शेंगदाणा लाडू (२५ ग्रम) - ५.०० रु., डिंक लाडू (२५ ग्रम)- १८.०० रु., नाचणी लाडू (२५ ग्रम)- १०.०० रु तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंर्तगत येणाऱ्या बालवाडी शाळेतील विद्यार्थांना मे. सहयाद्री इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट,निगडी प्राधिकरण मार्फत सकस पोषण आहार पुरविणेबाबतची प्रशासकीय कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**ठराव क्रमांक - ११** विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०३/०२/२०२२
सुचक :- मा. शैलेश मोरे अनुमोदक : मा. मनिषा पवार
संदर्भ - मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र मोरे व मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण

होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. एका विद्यार्थामागे र.रु. २,५००/- आहे.तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील इ. ६ वी ते इ.७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्या मार्फत हस्ताक्षर सुंदर हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**राजापुरे माधवी राजेंद्र**)
**सभापती**
मा.शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८७/२०२२
दिनांक : ०४/०३/२०२२

(**उल्हास बबनराव जगताप**)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.